साप्ताहिक

पत्रकारितेचे मुल्य जतन करणारे वृत्तपत्र

# न्यायस्वातंत्र्य समता

■ RNI. No- MAHMAR/2010/36016 संपादक :- रमेश शेळके कार्यकारी संपादक :- ॲड. चंद्रकांत गायकवाड

■ वर्ष ६ वे ■ अंक १९ वा ■ सोमवार, दि. ६ ते १२ जून २०१६ ■ पुणे web : nyayaswatantryasamta.weebly.com ■ किंमत २ रुपये ■ पाने ४

**सुवर्ण संधी**

वृत्तपत्रामध्ये काम
करण्याची सुवर्ण संधी,
वयाची अट नाही.
पत्रकारितेचे प्रशिक्षण
दिले जाईल.
संपर्क : ९८२२५३८५८५

## रिझर्व्ह बँकेचे व्याज दर 'स्थिर'!

### द्वैमासिक पतधोरण जाहीर



**नवी दिल्ली: वृत्तसंस्था**

सध्या रेपो रेट ६.५%, तर रिजर्व्ह रेपो रेट ६% इतका आहे. यात काहीही बदल झाले नाही. पहिल्याप्रमाणे ४% कायम ठेवण्यात आले आहे. असे राजन यांनी स्पष्ट केले.

डॉलर आणि रूपयांच्या मूल्यात होणाऱ्या बदलांवर लक्ष ठेवून आहोत, असे राजन म्हणाले, कच्चा तेलाच्या किमतीत होणारी वाढ आणि सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर मुद्रास्थितीत वाढ होण्याचा धोका आहे.

२०१६-१७ या वर्षी आर्थिक विकास दर ७.६% राहील असे अंदाज वर्तविले आहे असे राजन म्हणाले, सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीत वाढ होत असले तरी वैयक्तिक गुंतवणूक मात्र कमी होत आहे, ही चिंतेची बाब आहे.

एप्रिल महिन्यात पतधोरण आढाव्यात रिझर्व्ह बँकेने रेपो दरात पाव टक्क्याची कपात केली होती. पाठोपाठच्या दोन दुष्काळानंतर यावर्षी सरासरीतून अधिक पावसाची शक्यता आहे. मात्र, मान्सून वेळेत केरळमध्ये पोहोचलेली नसल्याने रेपो दरात कपात होण्याची शक्यता कमीच आहे. असे अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केला.

दुसऱ्या सदरात पंतप्रधान व अर्थमंत्री निर्णय घेतील.

राजन यांना रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदावर दुसऱ्यांदा संधी मिळणार का, यावर मोठी चर्चा सुरू आहे. राजन यांना दुसऱ्यांदा संधी मिळावी, यासाठी काही तज्ज्ञांनी 'ऑनलाईन' मोहीम सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर मला दुसऱ्यांदा संधी देण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री अरूण जेटली हेज निर्णय घेतील, असे राजन यांनी मंगळवारी स्पष्ट केले.

भाजपचे स्वामी यांनी राजन यांना दुसऱ्यांदा संधी देऊ नये, अशी जाहीर मागणी केली आहे. राजन यांनी जेटली यांना या मागणीचे पत्रही पाठवले आहे. जेटली यांनी मात्र या विषयावर थेट भाष्य करण्याचे टाळले आहे. राजन यांचा कार्यकाळ सप्टेंबर मध्ये संपणार आहे, या पार्श्वभूमीवर राजन यांना मुदतवाढ मिळणार की नाही, या चर्चेने चांगलाच जोर धरला आहे.

मंगळवारी दुसऱ्या पतधोरण आढाव्यानंतर पत्रकारांनी राजन यांना यबाबत विचारले. राजन म्हणाले, पंतप्रधान आणि अर्थमंत्री हे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदाबाबत निर्णय घेत असतात. त्यामुळे तेच योग्य तो निर्णय घेतील. मोदी व जेटली यांच्यासोबत माझी चर्चा झाल्यानंतरच मुदतवाढीबाबत निर्णय होईल.

आम्हाला माहिती आहे की, पत्रे लिहिली गेली आहेत आणि प्रसारमाध्यमांमध्येही याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. पण माझ्या दृष्टीने यात काहीही बातमी नाही, असेही राजन म्हणाले.

## मान्सून केरळच्या दारी...

पुणे : मान्सून कोणत्याही क्षणी केरळच्या दारी येणार असल्याचे हवामान तज्ज्ञांनी म्हटले आहे. आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजासाठी ही खुषखबर असून, मान्सून दि. ९ जून रोजी केरळामध्ये दाखल होईल, असे हवामान विभाग खात्याचे म्हणणे आहे. तर, मान्सून केरळच्या दारी दाखल झाल्याचा दावा स्कायमेट संस्थेने केला आहे.

दक्षिण भारत अरबी समुद्रासह मालदीव, कोमोरीन आणि आग्नेय बंगालच्या उपसागरापर्यंत मंगळवारी मान्सूनने धडक मारली असले तरी अद्याप, वेधशाळेने मान्सून दि. ७ जून रोजी केरळात दाखल होईल. असे जाहीर केले होते. परंतु, अनुकूल स्थितीचा अभाव असल्यामुळे मान्सून दाखल होण्यास अजून दोन दिवसांचा कालावधी लागणार आहे, असे वेधशाळेचे म्हणणे आहे.

अंदमान, निकोबार आणि लक्षद्विप बेटांवर दि.१६ मे रोजीच मान्सून दाखल झाला होता. दरम्यानच्या काळात या भागात मुसळदार सरकण्यास अनुकूल स्थिती नसल्यामुळे मान्सून रेंगाळल्या आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मान्सून केरळकडे सरकण्यास संबंधित भागात पाच दिवस सलग पाऊस पडणे गरजेचे आहे. या शिवाय किमान २.८ मिलीमीटर पाऊस दररोज होणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे वाऱ्यांची दिशादखील तेवढीच महत्त्वाची आहे या तीन बाबी अनुकूल असतील तरच मान्सून पुढे सरकण्यासाठी वातावरण तया होते.

मंगळवारी मालदीव, कोमोरिन आणि बंगालच्या उपसागरातील आग्नेय भागात मान्सूनने आगेकूच सुरू केली आहे. दरम्यान, दक्षिण अरबी समुद्रात कर्नाटकापासून केरळपर्यंत कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. यामुळे कोकण किनारपट्टी, गोवा, आंध्रप्रदेशची किनारपट्टी, कर्नाटक, केरळ भागात मुसळदार पाऊस पडणार असल्याचा इशारा वेधशाळेने दिला आहे.

## केशर आंब्याला मागणी वाढली

**पुणे :** रत्नागिरी हापूसचा हंगाम पुर्णपणे संपला असून आता गावरान हापूसची आवक वाढू लागली आहे. दरम्यान, बाजारामध्ये गुजरातच्या केशरची आवक वाढली असून मागणीही वाढली असल्याची माहिती आंब्यांचे व्यापारी अरविंद मोरे यांनी दिली.

गुलटेकडी मार्केटयार्ड येथील फळ विभागामध्ये रत्नागिरी हापूसची आवक संपली आहे तर बंगलोर आंब्याची आवक फक्त २५ टक्केच आहे. अशा परिस्थितीत सध्या गावरान हापूसची आवक वाढू लागली असून गुजरातच्या केशरीचीही आवक सुरू झाली आहे. बाजारामध्ये गुजरात येथून केशर आणि हापूसची आवक मोठ्या प्रमाणावर असून तब्बल सात ते आठ ट्रक आवक झाली आहे. या आलेल्या आंब्याला सध्या मागणी जास्त असून रमजानच्या उपवासासाठीही मागणी वाढू लागली असल्याचे मोरे यांनी सांगितले. बाजारामध्ये आलेल्या केशरच्या एक किलोला ३५ ते ५५ रूपये तर हापूसच्या एक किलोला ४० ते ७० रूपये भाव मिळाला आहे. आंब्यांची प्रत उत्कृष्ट असून चवीलाही गोड आहे एका किलोमध्ये साधारणत: २ ते ३ आंबे येत असल्याने ग्राहकांकडून त्याला जास्त मागणी आहे. तर गावरान आंब्यालाही मागणी जास्त असून त्याचे फळ मात्र आकाराला कमी आहे.

गोडीला चांगले असल्याने गावरान हापूसला मागणी वाढली असून या आलेल्या गावरान हापूसला २५ ते ५५ रूपये दर मिळाला आहे. मुळशी, मावळ, भोर आणि वेल्हा परिसरातून ही आवक होत असून बाजारात तब्बल तीन हजार डागाची आवक वाढून दर आगामी काळात वाढून दर आणखीन कमी होण्याची शक्यताही मोरे यांनी व्यक्त केले.

## छोटा राजनच्या खुनाचा प्रयत्न!



नवी दिल्ली: तिहार कारागृहात असलेल्या कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन सदाशिव निकाळजे उर्फ छोटा राजनचा हत्या करणाऱ्या चार हल्लेखोरांना दिल्ली पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. हे चौघे हल्लेखोर दाऊदचा उजवा हात असलेल्या छोटा शकीलच्या टोळीतील असल्याचे वृत्त आहे. इंडोनेशियातून राजनला अटक केल्यानंतर त्याला भारताच्या ताब्यात देण्यात आले होते. त्यानंतर त्याला तिहार कारागृहात ठेवण्यात आले आहे. या कारागृहातच राजनला संपविण्याचा छोटा शकीलचा डाव होता.

## दाभोलकर खून प्रकरणी 'सनातन' च्या विरेंद्र तावडेला अटक

**पुणे : प्रतिनिधी**



अनिसंचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर खून प्रकरणी हिंदू जनजागरण समितीच्या डॉ. विरेंद्र तावडे याला सीबीआयने शुक्रवारी रात्री अटक केली. या प्रकरणातील ही पहिलीच अटक आहे. तावडे याचे सनातन संस्थेशीही संबंध असल्याचे उघड झाल्याचे बोलले जाते. विरेंद्रला आज कोर्टापुढे हजर केले जाणार आहे. डॉ. दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३ मध्ये दुचाकीस्वारांनी झाडून खुन केली होती.

गेल्याच आठवड्यात पुण्यातील सारंग आकोलकर व पनवेल येथील विरेंद्र तावडे याच्या घरावर सीबीआयने छापा टाकला होता. आकोलकर फरार आहे, तर विरेंद्रची आठवड्याभरात तीन-चार वेळा चौकशी झाली होती. कालही त्याची चौकशी करण्यात आली. अखेर रात्री विरेंद्रअ हे दोघे ई-मेलवरून एकमेकांच्या संपर्कात असल्याचेही स्पष्ट झाले आहे. सीबीआय सारंगचा शोध घेत आहे.

डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणातचे काहीच धागेदोरे पुणे पोलिसांच्या हाती धागे लागत नव्हते. त्यामुळे हा तपास सीबीआकडे सोपविण्यात आला. मात्र, तोही संथगतीने सुरू होता. अखेर कोर्टाने फटकारल्यानंतर तपासात काहीसा वेग आला. त्याची फलनिष्पत्ती मागील आठवड्यातील छापेमारीत दिसून आली. विरेंद्रच्या पनवेलमधील घरावर सीबीआयने छापे टाकले. डॉ. दाभोलकर खून प्रकरणात विरेंद्रचा नेमका सहभाग काय? याबाबत अद्याप काही स्पष्ट होऊ शकलेले नाही. मध्यंतरी, डॉ. दाभोलकरांपाठोपाठ कॉ. गोविंद पानसरे आणि कर्नाटकातील डॉ. कलबुर्गी यांची हत्या झाली होती. या तिन्ही खूनाशी मारेकऱ्यांचा जवळचा संबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात होता.

सुरूवातीपासूनच सनातन संस्था संशयाच्या घेऱ्यात होती. पानसरे खून प्रकरणी समीर गायकवाड याला अटक झाली आहे. तर, कलबुर्गी खून प्रकरणाला कर्नाटक पोलिस तपास करीत आहेत. रूद्र गौडा पाटील याचा खूनामागे हात असू शकतो अशी आशा व्यक्त केली होती.

## पाषाणमध्ये अंधांचा सामूहिक विवाह

### कार्यकर्त्यांना हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी समाजसेवेचे बाळकडू दिले : निम्हण

**औंध :प्रतिनिधी**

पाषाण येथे शिवसेना सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने अंध वधू-वरांचा सामुहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. संत तुकाराम मंगल कार्यालय सुस सोड येथे अतिशय दिमाखात हा विवाह सोहळा पार पाडण्यात आला. कार्यकर्त्यांना हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी समाजसेवेचे बाळकडू दिले आहे. त्यामुळे शिवसेनेचा सुवर्णमहोत्सवी वर्ष समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा केला जात आहे. असे शिवसेना शहर प्रमुख विनायक निम्हण यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन संजय निम्हण, उपशहर प्रमुख शाम देशपांडे, छाया भोसले, उत्तम मांढरे, अभिनेते गोविंद नामदेव, अभिनेत्री सुप्रिया पठारे, श्रीकांत माडचेट्टी, आदी उपस्थित होते.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे पाषाणमधील ग्रामस्थ भरावून गेली होती. वधू-वरांना पोशाख, भांडीकुंडी ही देण्यात आली.

या उपक्रमाबरोबरच पाषाण भागात शिवसेनेच्या वतीने मोफत पी.यु.सी.चाचणी, शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन, विविध वाहनांचा लोकार्पण सोहळा, मोफत आधार कार्ड व पॅनकार्ड, शासन आपल्या दारी हे उपक्रमही राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचे शहरात कौतुक होत आहे.

## मुलीचा विनयभंग करणाऱ्याला अटक

**पुणे:** अल्पवयीन मुलीला रस्त्याला गाठून तिचा विनयभंग करणाऱ्या एकाला चिंचवड पोलिसांनी अटक केली. त्याला विशेष न्यायाधीश मंगला धोटे यांनी १० जूनपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

विकास अनिल टायगर (१९, रा. ओमसाई कॉलनी, चिंचवडेनगर, चिंचवड) असे पोलिस कोठडी झालेल्याचे नाव आहे. दि. ४ जून रोजी दुपारी हा प्रकार घडला. गुन्ह्याच्या तपास करण्यासाठी आरोपीच्या पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली. न्यायालयाने ती मंजूर केली. चिंचवड गाव आणि परिसरात असे प्रकार वाढत असल्याने चिंता व्यक्त होत आहे.

## युवा मोर्चा अध्यक्षपदासाठी भाजपची चाचपणी

पुणे : भारतीय जनता पार्टीने जिल्हा युवा मोर्चाच्या अध्यक्षपदासाठी चाचपणी सुरू केली आहे. या पदासाठी नेमका कसा चेहरा दिला जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाजप जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मावळचे आमदार बाळा भेगडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. मात्र, आता जिल्हा परिषदेच्या निवडणूका डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी विविध पद वाटपासाठी चाचपणी सुरू केली आहे. यातीलच युवकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले पद जिल्हा युवा मोर्चाचे असल्याने या पदाकरिता 'फिल्डिंग' लावली आहे. यामध्ये सुदर्शन चौधरी, राजेंद्र भुजबळ, अजिंक्य चव्हाण, किरण पाचंगे, आदींची नावे आघाडीवर आहेत. यातील नेमका कोणाच्या गळ्यात जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्षपद पडणार? याविषयी उत्सुकता वाढली आहे.

भाजपमध्ये आता अनेक तरूण पुढे येत आहेत. तरूणांची मोट बांधण्याची जबाबदारी जिल्हाध्यक्ष बाळा भेगडे आणि योगेश टिळेकर यांची राहणार आहे. सुदर्शन चौधरी यांच्या गळ्यात नुकतीच सरपंच पदाची माळ पडली आहे.